# पोलीस उपायुक्त परि– ६, मुंबई

## शिवाजीनगर पोलीस ठाणे, गोवंडी, मुंबई

## SHIVAJINAGAR, POLICE STATION, GOVANDI, MUMBAI.

सदैव तत्पर, सदैव मदतीस

**प्रेस नोट** दि. २७/०७/२०२२

**एन.डी.पी.एस कायदयाअंतर्गत केलेल्या कारवाई बाबतची माहिती**

मा. पोलीस आयुक्त, श्री. विवेक फणसाळकर, मा. सह पोलीस आयुक्त ( का व सु ) श्री. विश्वास नांगरे–पाटील, मा. अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री. सजंय दराडे, मा. पोलीस उपायुक्त परि–६, श्री. कृष्णकांत उपाध्याय, यांनी युवा पिढी नशेच्या आहारी जात असल्याने व त्यामुळे वाढणारी गुन्हेगारीवर आळा बसवण्याचे उद्देशाने अंमली पदार्थ विरोधात धडक मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत.

नमुद आदेशाचे अनुशंगाने मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, देवनार विभाग, श्री. नितीन जाधव यांचे सुचनेप्रमाणे, शिवाजीनगर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अर्जुन रजाने यांचे मार्गदर्शनानुसार शिवाजीनगर पोलीस ठाणे परिसरात चालु केलेल्या कार्यवाहीत शिवाजीनगर पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक धनंजय देवडीकर व पथक यांनी दि २७/०७/२०२२ रोजी पोलीस ठाणे हद्दीमध्ये गस्त करीत असताना रफिनगर, कब्रस्तान कडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजुला असणाऱ्या सार्वजनिक शौचालयाचे बाजुला असणाऱ्या पार्किंगमध्ये उभी असलेली रिक्षा क्र MH 03 CG 5147 मध्ये बसलेले दोन संशयित इसम यांनी प्लास्टिकच्या गोणीमध्ये काहीतरी भरले असल्याचा संशय आल्याने, त्यांना ताब्यात घेऊन रात्रपाळी पर्यवेक्षक पो.नि मस्के व दोन पंचासमक्ष आरोपीनामे १) नदीम अहमद मोहम्मद हारुन शेख, वय ३१ वर्षे व २) साहील वसीम खान, वय २१ वर्षे यांचेताब्यातील प्लास्टिकच्या गोणीची तपासणी केली असता त्यामध्ये WELCYREX CHLORPHEINRAMINE MALEATE & CODEINE PHOSPHATE SYRUP च्या ४३० बाटल्या किंमत अंदाजे १,७२,०००/– रुपये, दोन मोबाईल व ऑटो रिक्षा असा एकुन ३,२९,०५०/– रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन त्यांचे विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे वि.स्था.ख.क्र ७८७/२०२२ कलम ८ (क) सह २२, २९ एन.डी.पी.एस कायदा १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि धनंजय देवडीकर करीत आहेत.

सदरची कारवाई शिवाजीनगर पोलीस ठाणेचे **वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन रजाने** यांचे मार्गदर्शनाखाली **पो.नि नेताराम मस्के, स.पो.नि धनंजय देवडीकर, पो.ह. शिंदे, पो.शि. मोरे, पो.शि. घारे, पो.शि. खिलारे, पो.शि. सुतार** यांनी केलेली आहे.

27.7.22

( अर्जुन रजाने )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
शिवाजीनगर पोलीस ठाणे, मुंबई

Scanned with OKEN Scanner